दि. ०६/०५/२०२३

म. टा. पा. नं. १

# भाकरी थांबली आहे !

## पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा मागे घेताना पवार यांचे उद्गार

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देत असल्याची घोषणा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी गेल्या मंगळवारी अचानक केल्यानंतर पक्षात निर्माण झालेला हलकल्लोळ अखेर शुक्रवारी शमला. पक्षातील नेते, कार्यकर्ते यांचा आग्रह, आर्जवे याच्या पार्श्वभूमीवर पवार यांनी अध्यक्षपदाचा आपला राजीनामा शुक्रवारी मागे घेतला. 'मी भाकरी फिरवायला निघालो होतो; पण भाकरी थांबली आहे' असे उद्गार काढत पवार यांनी आपला निर्णय भरगच्च पत्रकार परिषदेत जाहीर केला.

गेल्या मंगळवारी पवार यांनी अध्यक्षपदाच्या राजीनाम्याची घोषणा करताना, पुढील अध्यक्षपदाची निवड करण्यासाठी समितीची घोषणा केली होती. त्यानंतर राष्ट्रवादीत जोरदार घुसळण सुरू होती. पवार यांनी राजीनामा मागे घ्यावा, अशी विनंती पक्षातील सर्वच घटक करीत होते. त्या धर्तीवर शुक्रवारी सकाळी राष्ट्रवादीच्या संबंधित समितीची बैठक झाली. त्यात पवार यांचा राजीनामा नामंजूर करण्यात आला. त्यानंतर पवार यांनी संध्याकाळी येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत राजीनामा मागे घेत असल्याचे जाहीर केले.

'राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा कमालीचा आग्रह आणि समविचारी पक्षातील नेत्यांचे आवाहन लक्षात घेऊन पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा आपण मागे घेत आहोत', अशी घोषणा त्यांनी केली. 'असंख्य कार्यकर्त्यांच्या भावनेचा मी अनादर करू शकत नाही. काँग्रेस नेते राहुल गांधी, माकपचे सीताराम येचुरी यांच्यासारख्या अनेक नेत्यांनी संपर्क साधून सध्याच्या काळात कार्यरत राहण्याची गरज बोलून दाखवली होती. त्या सर्वांच्या भावनांचा आदर करून अध्यक्षपदावरुन निवृत्त होण्याचा निर्णय मागे घेत आहे', असे (पान २वर)

**राष्ट्रवादीच्या समितीकडून निवृत्ती नामंजूर**

**पत्रकार परिषदेत निर्णयाची पवार यांची घोषणा**

**पक्षातील हलकल्लोळ चौथ्या दिवशी शमला**



शरद पवार यांच्या पत्रकार परिषदेस उपस्थित नेते.

### 'वेगळ्या' विचाराचा गट नाराज

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

राज्यात २०१९च्या विधानसभा निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत येण्याची चिन्हे नसताना शरद पवार यांनी शिवसेनेला सोबत घेत महाविकास आघाडीच्या रूपाने राज्यात सत्ता आणली. मात्र, एकनाथ शिंदे यांनी या सत्तेला सुरूंग लावला. शरद पवार आताही भाजपसोबत सत्तेचे समीकरण जुळवतील व आपल्याला तपास यंत्रणांच्या ससेमिऱ्यातून वाचवतील, अशी राष्ट्रवादीतील आमदारांच्या एका गटाला आशा होती. मात्र, पवारांनी राजीनामा मागे घेण्याचे जाहीर केल्याने राष्ट्रवादीतील आमदारांचा वेगळ्या विचाराचा एक गट नाराज झाल्याचे समजते. (पान २वर)

### जयंत पाटील यांना 'बढती'?



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात संघटनात्मक बदल होणार असून, नव्या पिढीतील कार्यकर्त्यांना संधी देऊन नवे नेतृत्व घडविणार असल्याचे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी जाहीर केले आहे. यामुळे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना सध्याच्या पदावरून बढती देऊन त्यांना राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी दिली जाणार असल्याचे सूत्रांकडून समजते. ➤ वृत्त...२

### अजित पवार यांच्या अनुपस्थितीची चर्चा

'मी माझ्या सहकाऱ्यांना विश्वासात न घेता निवृत्तीची घोषणा केली होती. आपल्या राजीनाम्याची कल्पना केवळ अजित पवार यांनाच होती', असे पवार यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला अजित पवार अनुपस्थित आहेत याकडे लक्ष वेधता, 'सर्वच नेत्यांनी पत्रकार परिषदेला उपस्थित असणे आवश्यक नसते', असे उत्तर पवार यांनी दिले.



### 'एकजुटीला बळ'

**मुंबई :** 'राज्यासह देशातील सर्वपक्षीय नेते, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा आग्रह मान्य करून अध्यक्ष पदावर कायम राहण्याचा शरद पवार यांनी घेतलेला निर्णय माझ्यासह पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारा आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस, महाविकास आघाडीसह देशातील विरोधी पक्षांच्या एकजुटीला बळ देणारा आहे', अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांनी दिली. ➤ वृत्त...२

CamScanner

दि. ०६/०५/२०२२

म. टा. पु. पा. नं. १

# मिरा रोडमध्ये रिक्षाची पादचाऱ्यांना धडक

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

## सात ते आठजण जखमी

मिरा रोडमध्ये एका भरधाव रिक्षाने सात ते आठ पादचाऱ्यांना व काही वाहनांना धडक दिल्याची घटना गुरुवारी रात्री घडली आहे. या घटनेत काही नागरिक जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार केले जात आहेत. संबंधित रिक्षाचालक प्रमोद शुक्ला (४०) याला नयानगर पोलिसांनी अटक केली असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे

मिरा रोडच्या नया नगर परिसरात गुरुवारी रात्री साडेनऊच्या सुमारास अचानक एका भरधाव रिक्षाने काही पादचाऱ्यांना व वाहनांना धडक दिली. रिक्षाचालकाला स्थानिक नागरिकांनी पकडण्याचा प्रयत्न केला असता तो पुन्हा भरधाव वेगाने रिक्षा घेऊन निघून गेला. यादरम्यान त्याने अनेक नागरिक व वाहनांना धडक दिली. त्यानंतर त्याला याच परिसरातील एका शाळेजवळ अडवण्यात आले. प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीनुसार रिक्षाचालकाने मद्यपान केले होते .

या घटनेत रिक्षा चालकाने सात ते आठ जणांना धडक दिल्याने काहीजण किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार केले जात आहेत. आठ ते दहा वाहनांचे रिक्षाने धडक दिल्यामुळे नुकसान झाले आहे. नया नगर पोलिसांनी वेगाने रिक्षा चालवणाऱ्या ४० वर्षीय प्रमोद शुक्ला ह्याला अटक करत गुन्हा दाखल केला आहे या प्रकरणाचा पुढील अधिक तपास सुरू असल्याचे माहिती पोलिसांकडून देण्यात आली .

म. टा. पु. पा. नं. १

# फळविक्रेत्याला मारहाण करणाऱ्याला अटक

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

दिव्यांग फळविक्रेत्याला मारहाण करणाऱ्या एका माथेफिरूला भाईंदरमध्ये नुकतीच अटक करण्यात आली. पैसे न देता बळजबरीने केळी घेतल्याचा जाब या फळविक्रेत्याने विचारला. त्याचा राग येऊन त्याला या माथेफिरुकडून मारहाण करण्यात आल्याचा हा व्हिडीओ समाजमाध्यमांवर पसरला होता. त्यानंतर भाईंदर पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली.

काही दिवसांपूर्वी भाईंदर पश्चिमेच्या रस्त्यावर हातगाडीवरून एक दिव्यांग फळविक्रेता केळी विकत होता. त्यावेळी एकाने केळी विक्रेत्याच्या हातगाडीवरून बळजबरीने काही केळी उचलली आणि खाल्ली. केळीविक्रेत्याने त्या इसमाला जाब विचारला. तेव्हा उलट त्यालाच शिवीगाळ करत बेदम मारहाण करण्यात आली होती. हा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत असल्याने मारहाण करणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात होती. त्यानंतर, मारहाण करणाऱ्या जेसन डिसुझा नामक माथेफिरुविरोधात भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि त्याला अटक करण्यात आली.

पुण्य नगरी पु. पा. न. १

# तत्कालीन सत्ताधारी भाजपने घेतलेले निर्णय नगरविकास विभागाकडून रद्द

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेतील तत्कालीन सत्ताधारी भाजपने महासभेत ठराव करून ६१८ कोटी ४९ लाखांची कामे व नगरसेवक निधीत केलेली १० कोटींची वाढ लोकहिताची नसल्याचा राज्य सरकारने ठपका ठेवत स्थगित केले आहेत. तत्कालीन सत्ताधारी भाजपच्या नियमबाह्य कारभारावर शासनाने पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेचा २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाला महासभेत तत्कालीन सत्ताधारी भाजपकडून बहुमताच्या जोरावर मंजुरी देण्यात आली होती. या वेळी भाजपने महापालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महापौर, उपमहापौर, सभागृह नेते, नगरसेवक इत्यादींसाठी राखीव असणाऱ्या १५ कोटींच्या निधीत अतिरिक्त तब्बल १० कोटींची वाढ करण्याची तरतूद केली होती. तसेच अर्थसंकल्पाला मंजुरी देताना ६१८ कोटींच्या खर्चाची १४४ कामांच्या यादीला आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिल्याचा ठरावदेखील मंजूर करण्यात आला होता. त्या वेळी



विरोधी पक्षाने आरोप केले होते. शासन नियमानुसार स्वेच्छा निधी महापालिकेच्या वार्षिक उत्पन्नाच्या २ टक्क्यांपेक्षा जास्त असू नये. असे असतानाही त्यामध्ये १० कोटींची वाढ करण्यात आली.

महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी राज्य शासनाकडे नियमानुसार, १५ कोटींच्या निधीच्या वापरास परवानगी द्यावी तसेच प्रशासनाने महासभेला कोणत्याही विकासकामांच्या यादीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केलेला नसताना त्याला परस्पर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. त्यामुळे आयुक्तांनी हे निर्णय रद्द करण्याची मागणी राज्य शासनाकडे केली होती. त्यानुसार शासनाने ऑक्टोबर महिन्यात आदेश जारी करत, वाढीव स्वेच्छा निधी आणि विकासकामांची मंजूर करण्यात आलेल्या कामांची यादी आर्थिक हिताविरोधी असल्याचे सांगत तो ठराव विखंडित केला होता.

ठराव विखंडित केल्यानंतर महापालिकेला ३० दिवसांच्या आत आपले मत मांडण्याची मुदत देण्यात आली होती. महापालिकेने पूर्वी घेतलेल्या निर्णयाप्रमाणेच ठाम भूमिका घेत मत सादर केले होते. त्यामुळे राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडून बुधवारी अंतिम आदेश जारी करत तत्कालीन सत्ताधारी भाजपने मंजूर केलेले दोन्ही ठराव रद्द केले आहेत.

CamScanner

दि. ०६/०५/२०२३

पुण्य नगरी पा. नं. ४

# मणिपूरमध्ये तणावपूर्ण शांतता, ६००० जवान तैनात

## ■ संचारबंदी लागू, मोबाईल इंटरनेट, रेल्वे सेवा बंद





■ **इम्फाळ** : मणिपूरमध्ये बहुसंख्याक मैतेई समुदायाच्या आरक्षणावरून भीषण हिंसाचार उफाळून आल्यानंतर राज्यात शुक्रवारी तणावपूर्ण शांतता पाहायला मिळाली. हिंसाग्रस्त भागात लष्कर व आसाम रायफल्सचे ६००० जवान तैनात आहेत, तर १६ पैकी ८ जिल्ह्यांत संचारबंदी लागू आहे. प्रतिबंधात्मक उपायोजना म्हणून राज्यात मोबाईल इंटरनेट व रेल्वे सेवा बंद ठेवण्यात आली आहे. बाहेरून आलेल्या रेल्वे मणिपूरमध्ये सोडल्या जात नाहीत. आतापर्यंत जाळपोळ, तोडफोड झालेल्या भागातून ११ हजार आदिवासींना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे.

मणिपूरमध्ये मैतेई समुदायाला अनुसूचित जातीमध्ये (एसटी) सामील करुन घेण्यावरून हिंसाचाराचा भडका उडाला आहे. राज्यभरात जाळपोळ, तोडफोड व हिंसाचार घडला. त्यामुळे परिस्थिती तणावपूर्ण आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून राज्यात लष्कराचे ६००० जवान पहारा देत आहेत. नागालँडमार्गे अतिरिक्त सैनिकांची कुमक बोलवण्यात आली आहे. हवाई दलातील सी-१७ ग्लोबमास्टर व एएन-३२ विमान जवानांना घेऊन आसामच्या तेजपूर व गुवाहाटीत दाखल झाले आहे. शीख रेजिमेंट इम्फाळ पश्चिम जिल्ह्याच्या लांगोल येथे बचाव अभियान राबवत आहे. सर्वांच्या प्रयत्नांनी मणिपुरातील हिंसाचार रोखण्यात यश आले, अशी माहिती संरक्षण मंत्रालयाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली. आतापर्यंत ११ हजार नागरिकांना लष्कर व शासकीय शिबिरांमध्ये हलवले आहे.

चुराचांदपूर व इतर संवेदनशील भागात जवानांचे ध्वज संचलन सुरू आहे. चुराचांदपूर जिल्ह्यातील कांगवई, विष्णुपूर जिल्ह्यातील फौगाकचाओ व इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील दोलाईथाबी व पुखामध्ये हिंसाचार घडवणारा समूह व सुरक्षारक्षकांमध्ये चकमक झाल्याचे वृत्त आहे. दरम्यान, मणिपूरमध्ये तैनात जवान, शीघ्र कृती दल यांच्यात समन्वय साधण्याची जबाबदारी केंद्रीय राखीव पोलीस दलाकडे (सीआरपीएफ) सोपवली आहे. दुसरीकडे मैतेई व नागा-कुकी जातींचे विद्यार्थी मेघालयची राजधानी शिलाँगमध्ये भिडले आहेत. दोन्ही गटांत जोरदार हाणामारी झाली. त्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत १६ जणांना अटक केल्याचे सूत्रांनी सांगितले.

### गृहमंत्र्यांचे बारकाईने लक्ष

मणिपूरच्या स्थितीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे बारकाईने लक्ष आहे. राज्य तथा केंद्र सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत ते संपर्कात आहेत. सुरक्षा व गुप्तचर संस्थांकडून ते वेळोवेळी परिस्थितीचा आढावा घेत आहेत. या सोबतच शाह यांनी नागालँडचे मुख्यमंत्री नेफ्यू रिओ, मिझोरमचे मुख्यमंत्री जोरमथांगा व आसामचे मुख्यमंत्री हिमंत विश्व शर्मा यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली आहे.

दि. ०६/०५/२०२३

पुण्य नगरी पु. पा. नं. १

# पोलिसांना दिलेली जागा पालिकेला देण्याची मागणी

**मीरा रोड :** मीरा रोडमधील लतीफ पार्क, कनाकिया परिसरातील एक सरकारी जमीन जिल्हाधिकाऱ्यांनी काही वर्षांपूर्वी पोलीस प्रशासनाला दिली होती; परंतु ही जमीन महापालिका विकास आराखड्यात मैदानासाठी आरक्षित असल्याचा दावा महापालिकेने केला आहे. त्यामुळे ती जागा महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेच्या विकास आराखड्यात मीरा रोडच्या बेवर्ली पार्क परिसरातील महसूल विभागाच्या जागेत मैदानासाठी आरक्षण दाखवण्यात आले आहे.

या जागेचे एकूण क्षेत्रफळ २६ हजार ६०० चौरस मीटर इतके आहे. यातील २५ हजार ५०० चौरस मीटर जागा जिल्हाधिकाऱ्यांनी महापालिकेला हस्तांतरित केली आहे. त्यातील उरलेली जागा काही वर्षांपूर्वी पोलीस प्रशासनाला वापरण्यासाठी देण्यात आलेली आहे. या जागेत काही महिन्यांपूर्वीच पोलिसांना सरावासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. परंतु या जागेच्या बाजूला महापालिका पूर्ण भूखंड विकसित करत आहे.

त्या जागेतदेखील आरक्षण असल्यामुळे हे आरक्षण विकसित करण्याच्या दृष्टीने महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी महापालिका प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे केली आहे. त्यामुळे आता ही जागा पोलिसांना मिळणार की महापालिकेला हस्तांतरण होणार याबाबत काय निर्णय घेतला जातो, याकडे लक्ष लागले आहे.

पुण्य नगरी पा. न. १

# उद्धव ठाकरे यांच्या राजापूरच्या सभेला परवानगी नाकारली

**मुंबई :** उद्धव ठाकरे यांच्या बारसू दौऱ्यातील सभेला तसेच रिफायनरी समर्थकांच्या मोर्चाला जिल्हा प्रशासनाने परवानगी नाकारली. शिवसेनेचे (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा शनिवारी राजापूर दौरा आहे.



बारसू रिफायनरी प्रकल्प विरोधकांशी संवाद साधण्यासाठी शनिवारी रानतळे इंग्लिश मीडियम स्कूल येथे ठाकरे यांची सभा होणार होती. मात्र ठाकरे यांच्या या सभेला प्रशासनाने परवानगी नाकारली. रिफायनरी प्रकल्प समर्थक शनिवार, ६ मे रोजी सकाळी ११ वाजता मोर्चा काढणार होते. त्यांनाही परवानगी नाकारण्यात आली. या दोन्हीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. जिल्ह्यात मनाई आदेश जारी करण्यात आलेले आहेत. या कारणांमुळे या परवानग्या नाकारण्यात आल्या असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

सामना पा. न. ८

## कारवाई

**भाईंदर** - मीरा रोड परिसरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादेशी घुसखोरांना पोलिसांनी अटक केली आहे. हे सर्व घुसखोर मीरा रोड रेल्वे स्थानकाजवळील पादचारी पूल, अस्मिता व्हिण्टेज, शांती पार्क, उमाकांत मिश्रा चौक, नयानगर, मीरा रोड पूर्व या भागात वास्तव्य करीत होते. ही माहिती नयानगर पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी सर्व ठिकाणी सापळा रचून घुसखोरांना ताब्यात घेतले. घुसखोरांमध्ये सहा महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे.

सामना पा. न. ८

## मुलाचे अपहरण

**वसई** - नालासोपारा येथील संतोष भुवन परिसरात राहणाऱ्या एका १४ वर्षीय मुलाचे अज्ञात आरोपींनी अपहरण केले आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पेल्हार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा मुलगा घरातून काही कामानिमित्त बाहेर पडला तो पुन्हा घरी परत आलाच नाही. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला, मात्र तो कुठेच आढळून आला नाही. त्यानंतर त्याच्या वडिलांनी पोलिसांत तक्रार केली.

CamScanner

दि. ०६/०५/२०२३

सामना पा.नं. ३

# पोलीस भरतीत बोगस 'राजपूत भामटां'ची घुसखोरी

## दोषींवर कारवाईची शिवसेनेची मागणी

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) – २०२१ मध्ये झालेल्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार झाला आहे. विमुक्त जाती प्रवर्गामध्ये ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले आहेत त्यातील बहुतेक उमेदवार या प्रवर्गातीलच नाहीत. अनेकांनी 'राजपूत भामटा' जातीचे दाखले अवैध मार्गाने मिळवत सरकारची आणि पोलीस खात्याची फसवणूक केली आहे. त्यामुळे खरे लाभार्थी नोकरीपासून वंचित राहिले आहेत. या पार्श्वभूमीवर बोगस उमेदवारांची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केली आहे.

पोलीस भरतीतील बोगस उमेदवारांचा पर्दाफाश शिवसेनेचे यवतमाळ जिल्ह्यातील पुसदचे उपतालुकाप्रमुख डॉ. अर्जुनकुमार राठोड यांनी केला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील संभाजीनगर, जालना, बीड, नाशिक, लातूर, धुळे, बुलढाणा या जिल्ह्यांत बोगसगिरीचे प्रमाण जास्त आहे. आर्थिक गैरव्यवहार करून डमी परीक्षार्थी बसवणे, जात पडताळणी समितीला मॅनेज करून जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवणे, दलालांमार्फत आर्थिक गैरव्यवहार करून बोगस प्रमाणपत्र मिळवणे, शासनाच्या नोकऱ्या व लाभ पदरात पाडून घेणे असे अनेक कारनामे केले जात आहेत. त्यातून पोलीस खाते सुटलेले नाही, अशी बाब डॉ. अर्जुनकुमार राठोड यांनी निदर्शनास आणली आहे. सर्वाधिक घुसखोरी 'राजपूत भामटा' विमुक्त जाती प्रवर्गात झाली आहे. त्या खालोखाल छप्परबंद, घिसाडी, गाडीलोहार या जातींत होत आहे. आदिवासी जमातीमध्ये तर हे प्रमाण जास्त आहे, असेही आढळून आले आहे.

**...तर उच्च न्यायालयात जाऊ**

पोलीस भरती प्रक्रियेतील बोगस उमेदवारांची चौकशी करून दोषींवर अजामीनपात्र फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. तसे झाले नाही तर भरती प्रक्रियेविरोधात उच्च न्यायालयात दाद मागू, असे राठोड यांनी सांगितले.

'राजपूत भामटा' ही एकेकाळची गुन्हेगार जमात आहे. त्यांची १९३१ साली ब्रिटिश सरकारने जातनिहाय जनगणना केली होती. त्यावेळी 'राजपूत भामटा'ची लोकसंख्या ६५०० असल्याची आकडेवारी जाहीर केली होती. १९५८ ते १९६० दरम्यान थाडे कमिशन नेमण्यात आले होते. या कमिशनने खऱ्या 'राजपूत भामटा' यांचा अभ्यास करून महाराष्ट्र सरकारला अहवाल सादर केला आहे.

सामना पा.नं. ८

### आयुक्तांनी पाचर मारल्याने डाव उधळला

# मीरा-भाईंदरच्या भाजप नगरसेवकांवरील स्वेच्छा निधीची खैरात अखेर रद्द

- महासभेचा ठराव सरकारने केला विखंडित
- ६१८ कोटींच्या कामांनाही ब्रेक

भाईंदर, दि. ५ (सा.वा.) – बहुमताच्या जोरावर मीरा-भाईंदर महापालिकेतील तत्कालीन सत्ताधारी भाजपने महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्षांसह नगरसेवकांवर स्वेच्छा निधीची खैरातच केली होती. तब्बल २५ कोटी रुपयांच्या या घोटाळ्याविरोधात विरोधी पक्षाने आवाज उठवला. तसेच दैनिक 'सामना'ने वृत्त प्रसिद्ध करत टीकेची झोड उठवली. यानंतर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी याची गंभीर दखल घेत नियमाची पाचरच घातली. त्यामुळे महासभेने पाठवलेला ठराव सरकारला विखंडित करावा लागला. याबरोबरच स्वतःचे खिसे भरण्यासाठी नव्याने मंजूर केलेल्या ६१८ कोटींच्या कामांनादेखील ब्रेक लावला आहे. त्यामुळे भाजपचा डाव उधळला गेला आहे.



पालिकेतील नगरसेवकांसाठी एकूण उत्पन्नाच्या दोन टक्के रक्कम स्वेच्छा निधीसाठी राखून ठेवण्याची तरतूद आहे. आपापल्या प्रभागातील विकासकामे तडीस लावण्यासाठी या निधीचा वापर केला जातो. मात्र पालिकेतील बहुमताच्या जोरावर तत्कालीन सत्ताधारी भाजपने महापौर, उपमहापौर, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते यांच्या स्वेच्छा निधीकरिता तब्बल २५ कोटी रुपयांची वाढीव तरतूद केली होती. तसेच अनेक ठिकाणी कामे केली असतानादेखील त्याच ठिकाणी नव्याने कामे करावी लागणार असल्याचे सांगून तब्बल ६१८ कोटींच्या खर्चाच्या यादीला आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली. त्यानंतर हा ठराव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला.

**विरोधी पक्षांसह नागरिकांच्या रेट्याने बसला दणका**

आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून कोट्यवधींच्या निधीचा घपला करण्याचा डावच तत्कालीन सत्ताधारी भाजपने आखला होता. मात्र याविरोधात विरोधी पक्षांसह नागरिकांनी आवाज उठवला. तसेच दैनिक 'सामना'ने २० एप्रिल २०२२ मध्ये 'मीरा-भाईंदर महापालिकेत सत्ताधारी भाजपचा स्वेच्छा निधी घोटाळा' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले. या रेट्याचा सत्ताधाऱ्यांना जबरदस्त दणका बसला. महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी याबाबत शासनाला पत्र लिहून महासभेने पाठवलेला ठराव नियमाला धरून नसून तो विखंडित करावा अशी मागणी केली. नियमाच्या या पाचरने सरकारला हा ठराव रद्द करावा लागला. त्यामुळे मीरा-भाईंदरमधील भाजप नेत्यांची चांगलीच गोची झाली आहे.

CamScanner

दि. ०६/०५/२०२३

लोकमत पु. पा. न. ३

ऐतिहासिक ठेवा उलगडणार, पुरातत्त्व विभागाने तपासणीसाठी नेले काही नमुने

# धारावी किल्ला, गोराई-मनोरीत आढळले पुरातन अवशेष

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरचा धारावी किल्ला, डोंगरी, गोराई व मनोरी भागात पुरातत्त्व विभागास अनेक पुरातन वस्तूंचे अवशेष सापडले आहेत. काही नमुने पुरातत्त्व विभागाने तपासणीसाठी नेले आहेत. त्यामुळे या भागातील ऐतिहासिक पुरातन ठेवा उलगडणार आहे.

राज्य मानवी हक्क आयोगाच्या आदेशानुसार पुरातत्त्व खात्याचे पुणे येथील पुरातत्त्वशास्त्रज्ञ प्रणीत कुमार यांनी येऊन धारावी किल्ल्यासह परिसराची पाहणी केली. डोंगरी - आनंद नगर येथे रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडी शिल्पाची पाहणी केली असता ते देहूगळ असून त्यावरील गाय-वासरू, स्तूप आदी पाहून ते सुमारे २ हजार वर्षे जुने असण्याची शक्यता वर्तवण्यात आली. तर त्या देहूगळचा बराचसा भाग जमिनीत असल्याने तो बाहेर काढल्यावर अधिक स्पष्टता येणार आहे. देहूगळ हे मध्यप्रदेशमध्ये जास्त प्रमाणात सापडते.

गोराई गावातील रस्त्यालगतच्या परिसरातही दगडी शिलालेख व पुरातन वास्तू आढळल्या. पाखाडी बस स्थानक बाजूला असलेल्या पुरातन शिलालेखावर त्या काळचा एकप्रकारचा आदेश असून महिला, प्राण्यांचे शिल्प आहे. ते गधेगळ असल्याची शक्यता असून पोर्तुगिजांच्या आधीच्या काळातील आहे, असे दोन गधेगळ दिसून आले आहेत. वैराळे तलाव येथे पुरातन चर्चचे अवशेष आहेत. उत्तन, गोराई व मानोरी या धारावी बेटावरील तिन्ही गावचे हे एकमेव चर्च होते.

त्याठिकाणी सुमारे ४८२ वर्षांपूर्वीची या तिन्ही गावची लोकसंख्या ८४० इतकी नमूद आहे. त्याकाळी पुरुष व महिला ७२० आणि मुलांची संख्या १२० इतकी कोरलेली आहे. त्या भागात जुना दगडी बांध आहे. मनोरी येथे कारंजा देवी मंदिराजवळ एक तोफ असून आणखी एक तोफ जमिनीत गाडली गेली आहे. दिसत असलेली तोफ ही ब्रिटिशकालीन असण्याची शक्यता वर्तवली गेली आहे. सदर तोफा ताब्यात घेण्यासाठी प्रस्ताव दिला जाणार आहे. या संपूर्ण परिसराच्या पाहणीदरम्यान पुरातत्त्व विभागाने पुरातन मातीच्या भांड्यांचे अवशेष, जुन्या भिंतीची माती, दगड, चिनी मातीच्या भांड्यांचे अवशेष आदी गोळा करून त्याच्या पडताळणी आणि तपासणीसाठी नेल्याचे माजी नगरसेवक तथा जंजिरे धारावी किल्ला जतन समितीचे रोहित सुवर्णा यांनी सांगितले.



## गैरप्रकारांची राज्य मानवी हक्क आयोगाकडून दखल

- भाईंदरच्या चौक भागात असलेल्या धारावी किल्ल्याच्या परिसरात चालणाऱ्या मद्यपान आदी गैरप्रकारांची दखल राज्य मानवी हक्क आयोगाने घेतली आहे. आयोगाने कानपिचक्या दिल्यानंतर पोलिसांनी गस्त वाढवली असून पालिकेने सहा सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. पालिकेने उभारलेल्या चिमाजी अप्पा स्मारकाजवळ पालिकेने २४ तास सुरक्षा रक्षक तैनात केले आहेत.
- आयोगाकडे २७ मार्चला झालेल्या सुनावणीवेळी माजी नगरसेवक तथा जंजिरे धारावी किल्ला जतन समितीचे रोहित सुवर्णा यांनी ऐतिहासिक धारावी किल्ल्याबाबतची माहिती मुख्य सचिवांकडे सोपवण्याची विनंती केली होती.
- त्यानुसार संबंधित विभागांनी आवश्यक माहिती मुख्य सचिवांकडे सादर करण्याचे आदेश दिले. त्याची पुढील सुनावणी ६ जुलै रोजी होणार आहे, तर पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी १७ जानेवारी २०२२ रोजी पुरातत्त्व विभागाच्या मुंबई येथील कार्यालयास पत्र देऊन पुरातन तोफा, दगडी शिल्प आदींची माहिती देऊन तपासणी करण्यास कळवले होते. येथे खोदकाम केल्यास अजून पुरातन वस्तू मिळतील, अशी शक्यताही आयुक्तांनी वर्तवली होती.



पुढारी पा. न. ४

# नालासोपारा-विरारची वाहतूककोंडी सुटणार कधी?

## बेशिस्त पार्किंगमुळे नागरिक संतप्त

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा हे अतिशय रस्त्यावरील गर्दीचे आणि वाहनांच्या प्रचंड वाहतुकीमुळे वाहतूक कोंडीचे शहर बनले आहे. मुळातच येथे बकाल वस्ती खूप असल्याने नालासोपारा पश्चिमेला विशेषत: वाहतूक कोंडी होते. रहिवाशांना रहदारीत चालणे, फिरणे मुश्किल होते.

रस्त्यावरील खड्डे, फेरीवाल्यांनी अडविलेले रस्ते, त्यांच्या चारचाकी गाड्या या सर्व रस्त्यावरील वाहतूक कोंडीला कारण आहेत. त्यामुळे शहरात वाहतूक सुरळित नाही. एक-दोन वाहतूक पोलिसांच्या मदतीने वाहतुकीवर नियंत्रण येत नाही. पूर्व-पश्चिम नागरी वस्ती कमालीची वाढत आहे. त्यामुळे त्याच्यावर कोणाचे नियंत्रण नाही. रिक्षा वाहतूक अनिर्बंध आहे. एसटी व पालिकेची परिवहन सेवा या प्रचंड गर्दीतच सुरु असते. एकूण या सर्व परिस्थितीत नागरीकांना रस्त्यावर फिरणे मुश्किल झाले आहे. वाहने चालविणे देखील अवघड झाले आहे. दिवसाचे सर्व वेळा येथे वाहतूक समस्या कायम आहे.

नालासोपारा पूर्वेच्या भागातून महामार्गाला जोडणारा मुख्य रस्ता गेला आहे. या रस्त्यावर वाहनांची वर्दळ अधिकच वाढली असून या भागात सातत्याने वाहतूक कोंडी असते. वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी अजूनही पालिका तसेच प्रादेशिक परिवहन सेवा व वाहतूक पोलिस यांनी एकत्र येऊन शहर नियोजनासाठी नवी रुपरेषा तयार करावी व वाहतुकीवर नियंत्रण आणावे.

CamScanner

CamScanner

दि. ०६/०५/२०२३

पुढारी पा. न. २

# बारसू रिफायनरीवरून कोकण तापणार

## उद्धव ठाकरे आज आंदोलकांना भेटणार; नारायण राणेंचा समर्थनार्थ मोर्चा

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

नाणारवरून बारसू येथे हलविण्यात आलेल्या रिफायनरीवरून कोकणात राजकारण तापणार आहे. उद्धव ठाकरे रिफायनरीविरोधक आंदोलकांना शनिवारी भेटणार आहेत. त्याचवेळी नारायण राणेंचा रिफायनरी समर्थनार्थ मोर्चाही निघणार आहे. त्यामुळे बारसू रिफायनरी विरोधक एका बाजूला, तर समर्थक दुसऱ्या बाजूला असा संघर्ष उभा राहिला आहे. शनिवारीच राज ठाकरेंची रत्नागिरीत जाहीर सभा होत आहे. त्यामुळे ठाकरे विरुद्ध ठाकरे असाही सामना पाहायला मिळणार आहे.

शनिवारी एकाच दिवशी उद्धव ठाकरेंची बारसू आणि महाड येथे सभा आयोजित करण्यात आली होती. बारसूच्या जाहीर सभेला पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंचा या भागात संपर्क दौरा होणार आहे, तर जाहीर सभा महाड येथे होईल.

बारसू येथील १३ हजार एकर जागेवर हा रिफायनरी प्रकल्प प्रस्तावित आहे. यातील ७० टक्के जागा ही यापूर्वीच परप्रांतीयांनी घेऊन ठेवली आहे. हा प्रकल्प येणार ही पावले ओळखूनच गेल्या १० वर्षांपासून जमिनी खरेदीचे चक्र सुरू झाले होते. त्यामुळे आज ना उद्या येथे प्रकल्प येणार ही कुणकुण स्थानिकांना होती. तेव्हापासूनच स्थानिकांमध्ये विरोधाची ठिणगी प्रज्वलित होत राहिली. एका बाजूला बेरोजगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी उद्योग येणे हे अनेकांना अनिवार्य वाटत आहर, तर दुसऱ्या बाजूला कोकणचे निसर्गसौंदर्य या प्रदूषणात विरून जाईल असे म्हणणारा स्थानिकांचा मोठा गट आहे. दरम्यान माती परीक्षणात जर सकारात्मकता आली तर हा प्रकल्प पुढे जाऊ शकणार आहे. या जमिनींना ४० हजार गुंठा म्हणजेच १६ लाख एकरी दर दिला जाणार आहे. मात्र चांगला दर मिळत असला तरी जमिनी न देण्यावर ३० टक्के शेतकरी ठाम आहेत. मात्र ७० टक्के शेतकऱ्यांनी सहमती दर्शवली आहे.

या प्रकल्पात ज्यांचे आर्थिक हितसंबंध यात आहेत ते प्रकल्प पुढे रेटण्याचा प्रयत्न करत आहेत. सर्वसामान्यांना इको सेन्सिटिव्ह झोन लावून घरबांधणीलाही आडकाठी आणणारे येथे मात्र मूग गिळून गप्प आहेत. राजकारण्यांनी हा अहवालच गुंडाळून ठेवला आहे. आज कोकणात होणारा विरोध हा इथल्या नकारात्मक मानसिकतेचा परिपाक आहे असे सांगून विरोध गुंडाळण्याचा प्रयत्नही होत आहे.

गेल्या तीन दशकांत कोकणात येणाऱ्या प्रकल्पांपैकी बहुतांश प्रकल्प मागे गेले. यामध्ये रायगडचा ड्रग बल्क फार्मा प्रकल्प असो की गेल प्रकल्प असो नाहीतर एन्रॉन हे सर्व प्रकल्प राहणे किंवा जाणे या गोष्टी भूमिपुत्रांपेक्षा राजकीय इच्छाशक्ती काय म्हणते यावरच त्यांचे भवितव्य ठरले आहे. या प्रकल्पाचेही भविष्यात तेच होईल.

कोकणात पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला जमिनीचा वारसा हा जतन करून ठेवण्याची प्रथा आहे. मात्र आपली वडिलोपार्जित जमीन जाणार हे समजल्यानंतर प्रथम नाणार प्रकल्पाला विरोध झाला. बारसूतही आपला जमिनीचा तुकडा वाचविण्यासाठी स्थानिक महिला, पुरुष रस्त्यावर येऊन लढा देत आहेत. मात्र हा लढा चिरडून टाकणे शासनाला काहीच अवघड नाही. मात्र तरीही या लढ्यामध्ये शेतकरी नेते राजू शेट्टी, शिवसेनेचा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या दोन संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. पण सरकारला मात्र हा प्रकल्प पूर्णत्वास न्यायचा असल्याने शासकीय यंत्रणा चारही दिशांना कार्यरत करण्यात आल्या आहेत.

हे लक्षात घेता लोकविरोधाचे कितीही प्रश्न उपस्थित झाले तरी प्रकल्प होण्याच्याच दिशेने वाटचाल सुरू आहे.







### प्रकल्पाला गती मिळणार

- यापूर्वी १९९५ मध्ये एन्रॉन प्रकल्प अरबी समुद्रात बुडवणार अशी घोषणा त्यावेळचे विरोधी पक्षनेते गोपीनाथ मुंडे यांनी केली होती. मात्र आज हा प्रकल्प दाभोळ येथे आकाराला आला आहे. मात्र पूर्वीएवढी क्षमता त्याला गाठता आलेली नाही. आता जैतापूरचा अणुऊर्जा प्रकल्प, नाणारनंतर बारसू येथे उभारला जात असलेला रिफायनरी प्रकल्प यामुळे राज्याचे राजकारण तापलेले असले तरी विरोधी पक्षाचे प्रमुख असलेले महाविकास आघाडीचे प्रमुख नेते शरद पवार यांनी या प्रकल्पाला सकारात्मकता दर्शवल्यामुळे या प्रकल्पाचा गाडा पुढे सरकण्याची शक्यता वाढली आहे.

CamScanner

लोकसत्ता पु. पा. न. ४

# वाहनकर आकारणीच्या निविदेला प्रतिसाद नाही

## सात महिन्यांपासून प्रक्रिया सुरूच

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरात रस्त्याच्या कडेला उभ्या राहणाऱ्या वाहनांना कर आकारण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यासाठी साधारण सात महिन्यांपासून निविदा प्रक्रिया राबवली जात आहे; परंतु यास कंत्राटदारांचा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे पालिकेला उत्पन्नावर पाणी सोडावे लागत आहे.

मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात लोकसंख्येबरोबरच वाहनांच्या संख्येतही वाढ होत आहे. त्यामुळे शहरातील रस्ते वाहतुकीसाठी अपुरे पडत असून, वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. अशा परिस्थितीत अनेक इमारतींमध्ये वाहनतळाची सुविधा उपलब्ध नसल्याने असे वाहनधारक रस्त्याच्या कडेलाच आपली वाहने उभी करत आहेत. त्यामुळे अशा वाहनांवर शुल्क आकारणी करून उत्पन्न वाढवण्याची शक्कल पालिकेने लढवली आहे. प्रशासनाने यासाठी विशेष सर्वेक्षण पूर्ण करून शहरातील १५ कमी वर्दळीची ठिकाणे वाहनतळासाठी वापरण्याचा निर्णय घेतला आहे.



> “रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या वाहनांवर कर आकारणीसाठी दर कमी करून निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. या निविदेची मुदत येत्या सोमवारी संपुष्टात येणार आहे.
>
> **- कल्पिता पिंपळे,**
> उपायुक्त, मीरा-भाईंदर पालिका

यात सर्वप्रथम पालिकेकडून रस्त्याच्या कडेला वाहनतळाकरिता चौकोन आखणार आहेत. पालिकेने तयार केलेल्या आराखड्यानुसार दोन हजार १४७ चारचाकी वाहने आणि तीन हजार ७३९ दुचाकी वाहने उभी करता येणार आहेत. शिवाय यामुळे पालिकेला वार्षिक आठ कोटी ४५ लाखांचे उत्पन्न मिळणार आहे. हे शुल्क वसूल करण्यासाठी तसेच वाहनांच्या सुरक्षेसाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येणार आहे.

या संदर्भातील निविदा पालिकेने ऑक्टोबर २०२२ मध्ये प्रसिद्ध केली होती. त्या वेळी निविदा प्रक्रियेला प्रतिसाद न मिळाल्याने कर आकारणीचे दर कमी करून पुन्हा ही निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. परंतु या निविदेलाही कंत्राटदारांचा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे प्रशासनाचे उत्पन्न बुडत आहे.

CS CamScanner

दि. ०६/०५/२०२३

लोकसत्ता पा. नं. १

### काँग्रेसने दहशतवादापुढे लोटांगण घातल्याचा आरोप

# कर्नाटक प्रचारात मोदींकडून ‘केरल स्टोरी’चे समर्थन

**पीटीआय, बल्लारी / नवी दिल्ली**

**‘द केरल स्टोरी’** हा सध्या चर्चेत असलेला चित्रपट शुक्रवारी देशातील राजकारणाच्या केंद्रस्थानी आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटकातील निवडणूक प्रचारसभेत, ‘‘या चित्रपटाने दहशतवादी कटकारस्थाने उजेडात आणली, अशी प्रशंसा केली, तर काँग्रेसने मतांच्या बेगमीसाठी दहशतवादापुढे लोटांगण घातले,’’ असा आरोप केला.

‘द केरल स्टोरी’ या चित्रपटाबाबत केरळ आणि तमिळनाडूमध्ये काही ठिकाणी संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. प्रेक्षकांमध्येही त्याचे समर्थक आणि विरोधक असे ध्रुवीकरण झाले आहे. तसेच काही ठिकाणी त्याविरोधात निषेधाचाही सूर उमटला आहे. त्याचवेळी केरळ उच्च न्यायालयाने या चित्रपटाच्या प्रदर्शनास स्थगिती देण्यास नकार दिला आणि त्याच्या ‘टीझर’मध्ये कोणत्याही विशिष्ट समुदायाबाबत आक्षेपार्ह आशय नसल्याचे स्पष्ट केले. पंतप्रधान मोदी यांनीही बल्लारी येथील निवडणूक प्रचारसभेत या चित्रपटाची प्रशंसा करताना काँग्रेसवर आरोपांच्या फैरी झाडल्या.

पंतप्रधान मोदी म्हणाले, ‘‘आपल्या देशातील इतके सुंदर राज्य, जेथील नागरिक मेहनती आणि प्रतिभावंत आहेत. त्या राज्यातील दहशतवादी कारस्थाने द केरल स्टोरी चित्रपटाने प्रकाशात आणली आहेत.’’ हा चित्रपट एका राज्यातील दहशतवाद्यांची घातकी धोरणे आणि कारस्थानांवर आधारित *(पान १२ वर)*




### ‘द केरल स्टोरी’ला स्थगितीस नकार

‘द केरल स्टोरी’ या चित्रपटाच्या ‘ट्रेलर’मध्ये कोणत्याही विशिष्ट समुदायाबाबत कोणताही आक्षेपार्ह आशय नसल्याचे स्पष्ट करीत केरळ उच्च न्यायालयाने त्याच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्यास शुक्रवारी नकार दिला. केरळमधील महिलांच्या गटाचे बळजबरीने धर्मांतर करून त्यांना आयसिस या दहशतवादी संघटनेत सामील होण्यास भाग पाडल्याचा उल्लेख ‘ट्रेलर’मध्ये आहे. त्याला केरळमधील सत्ताधारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसने आक्षेप घेतला होता. **- पान ९**

लोकसत्ता पु. पा. न. ४

# अत्याधुनिक शस्त्रासह वसईत दोघांना अटक

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार शहरात घातपाताचा प्रयत्न पेल्हार पोलिसांना हाणून पाडला आहे. याप्रकरणी दोन जणांना अटक केली असून, त्यांच्यातडून अत्याधुनिक ‘पिस्टल’ जप्त करण्यात आले आहे.

वसई पूर्वेतील रिचर्ड कंपाउंड परिसरात दोन जण शस्त्र घेऊन येणार असल्याची माहिती पेल्हार पोलिसांना मिळाली होती, त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने सापळा लावून मोईन शेख आणि शकील खान या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या झडतीत त्यांच्याकडे एक ‘ॲटोमॅटीक पिस्टल’ आणि काडतुस आढळून आले. या आरोपींविरोधात पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरात घातपात घडविण्यासाठी हे आरोपी आल्याचा संशय असून त्यादृष्टीने पोलीस तपास करत आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक वसंत लब्धे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सनील पाटील, सचिन बळीद, योगेश देशमुख, बालाजी गायकवाड आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

लोकसत्ता पु. पा. न. ४

## अंबाडी रोडे येथे आरोग्य तपासणी शिबीर

**वसई :** वसई रोड येथील शिवसेना ठाकरे गटातर्फे रविवार, ७ मे रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजिले आहे. यात डॉ. चेतन घरत हे कान, नाक, घसा याची तपासणी करणार आहेत. हे शिबिर सकाळी १० ते दुपारी १ दरम्यान विश्वकर्मा पॅरडाइज, अंबाडी रोड येथे घेण्यात येणार आहे. या शिबिराचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

CamScanner

लोकमत

# पिस्तूल, जिवंत काडतुसासह दोन आरोपींना केली अटक

## पेल्हारच्या गुन्हे शाखा पोलिसांची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** रिचर्ड कंपाउंड येथील मनीचापाडा परिसरात एक पिस्टल, एक जिवंत काडतुसासह दोन आरोपींना पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी गुरुवारी संध्याकाळी पकडले आहे. पेल्हार पोलिसांनी गुन्हा दाखल करून २५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या टीमला गुप्त माहिती मिळाली की, रिचर्ड कंपाउंडच्या मनीचापाडा येथील आर्म स्ट्राँग इंडिया कन्स्ट्रक्शन आरएमसी प्लँट कंपनीसमोर दोघे विनापरवाना पिस्तूल घेऊन येणार आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा लावून कारवाई करत आरोपी मोईन अन्वर शेख आणि शकील अहमद इसरार खान या दोघांना ताब्यात घेऊन झडती घेतल्यावर एक ॲटोमॅटिक पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस सापडले. पोलिसांनी मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करत दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

> दोन्ही आरोपींना शुक्रवारी वसई न्यायालयात हजर केल्यावर ८ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.
>
> - वसंत लब्दे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, पेल्हार पोलिस ठाणे

ही कामगिरी पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त रामचंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत लब्दे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) महेंद्र शेलार व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे उपनिरीक्षक सनिल पाटील, हवालदार योगेश देशमुख, गोरखनाथ खोत, प्रताप पाचुंदे, संदीप शेळके, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड, निखिल मंडलिक यांनी केली आहे. अधिक तपास पेल्हार पोलिस करीत आहेत.

Hello Vasai
Page No. 1 May 06, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

DIGITAL
मुंबई। शुक्रवार 05 मई 2023
प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# त्रिदिवसीय 285वां वसई विजयोत्सव आज से

**प्रवासी संदेश टीम।**

**वसई।** वसई तालुका कला-क्रीड़ा विकास मंडल और वसई विजय स्मारक समिति के सहयोग से वसई विरार शहर नगर निगम द्वारा आयोजित 285वां वसई विजयोत्सव 05 मई से 07 मई, 2023 तक जंजीरे वसई किला, वसई गांव में मनाया जा रहा है। विजयोत्सव में सायं 05.00 बजे से रात्रि 10.00 बजे तक बाल मेला, पारंपरिक भोजन उत्सव, किला निर्माण, रंगोली, शिवकालीन शिवराय सिक्के, ऐतिहासिक वस्तुएं एवं दस्तावेज, शस्त्र प्रदर्शनी एवं अराउंड द वर्ड लाइट शो आदि कार्यक्रमों का आयोजन किया जाएगा। वसई विजयोत्सव कार्यक्रम के तहत शुक्रवार 05 मई 2023 को दोपहर 3 बजे श्री वज्रेश्वरी योगिनीदेवी मंदिर से वसई किले तक मशाल यात्रा निकाली जाएगी। मशाल यात्रा का मुख्य आकर्षण लेजीम, ढोल मंडली और ऐतिहासिक विषय पर व्यक्तिगत पोशाक प्रतियोगिता होगी। शाम 6.30 बजे गणमान्य लोग श्रीमंत नरवीर चिमाजी अप्पा की अश्वारोही प्रतिमा पर पूजा और पुष्पांजलि अर्पित की जाएगी। इसके बाद शाम 7 बजे सांस्कृतिक कार्यक्रम 'दरिया का राजा' का आयोजन किया गया है। शनिवार 06 मई 2023 को शाम 07.00 बजे भारतीय स्वतंत्रता की संगीत गाथा नामक सांस्कृतिक कार्यक्रम का आयोजन




किया गया है। रविवार 07 मई 2023 को प्रातः 07.00 बजे से 10.00 बजे तक जंजीरे वसई किला भ्रमण एवं इतिहासविद् 'श्रीदत्त राउत' के साथ गाइडेड वांडरिंग कार्यक्रम एवं सायं 07.00 बजे भार्गव शेलार शिवागर्जन तालीम द्वारा मदार्नी खेलों का प्रदर्शन आयोजित किया जाएगा। साथ ही एक सांस्कृतिक कार्यक्रम भी रात्रि 08.00 बजे आयोजित किया गया है। 285वें वसई विजयोत्सव के अवसर पर आयोजित कार्यक्रमों में निःशुल्क प्रवेश है और सभी नागरिकों को कार्यक्रम में शामिल होकर कार्यक्रम की शोभा बढ़ानी चाहिए।

CamScanner

लोकमत

# ७३४ दिवस सायकल चालवण्याचा विक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : वसईच्या उमेश चंपकलाल पटेल यांनी सलग ७३४ दिवस दररोज १०० किलोमीटर सायकल चालवण्याच्या विक्रमाला गवसणी घातली आहे. या विक्रमाची नोंद इंडिया बुक्स ऑफ रेकॉर्डमध्ये करण्यात आली असून उमेशच्या या विक्रमी कामगिरीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

उमेश यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९७४ रोजी झाला होता. त्यांना लहानपणापासूनच सायकल चालवणे आवडत होते. त्यांनी सलग ७३४ दिवस १०० किलोमीटर सायकलिंग पूर्ण करून नव्या विक्रमाला गवसणी घातली आहे. त्यांनी ५ एप्रिल २०२१ रोजी दररोज १०० किलोमीटर सायकल चालवण्याच्या प्रवासाला सुरुवात केली. तो प्रवास ९ एप्रिल २०२३ रोजी पूर्ण झाला. उमेश यांच्या या विक्रमाची नोंद इंडिया बुक्स ऑफ



रेकॉर्ड अधिकाऱ्यांनी ११ एप्रिल रोजी घेतली आहे.

७३४ दिवस १०० किलोमीटर सायकलिंग करण्याच्या त्यांच्या ध्येयाप्रती पटेल यांचे समर्पण आणि वचनबद्धता प्रेरणादायी आहे. कठोर परिश्रम आणि जिद्दीने काहीही शक्य आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्याचे हे यश अनेकांना सायकल चालवण्यास आणि त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी स्वतःला झोकून देण्याची प्रेरणा देईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

Hello Vasai
Page No. 1 May 05, 2023
Powered by: erelego.com

CamScanner